# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990






लातूर वर्ष ३ रे अंक १७४ वा शुक्रवार दि.०८ डिसेंबर २०२३ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.


## दुष्काळ, अवकाळीमुळे शेतकरी संकटात, सरकार मात्र सुशेगात

नागपूर (प्रतिनिधी) : आधी दुष्काळ व आता अवकाळीच्या संकटामुळे बळीराजा उद्ध्वस्त झाला आहे. शेतक-यांच्या डोळ्यांत अश्रू असताना सत्ताधारी मात्र त्यांना दिलासा देण्याऐवजी सरकार आपल्या दारीचे इव्हेंट करून स्वत:चा डंका पिटण्यात मशगूल आहेत. आरक्षणाच्या मुद्यावरून मराठा व ओबीसी असा संघर्ष घडवण्याचे प्रयत्न सुरू आहेत. राज्यावरील वाढलेले कर्ज, शासकीय रुग्णालयात मृत्यूतांडव असे असंख्य प्रश्न आज राज्यासमोर उभे असून सरकार सर्व आघाड्यांवर अपयशी ठरले असल्याची घणाघाती टीका करताना, विरोधकांनी अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला मुख्यमंत्र्यांनी आयोजित केलेल्या चहापानावर बहिष्कार घातला. ओबीसी आणि मराठा आंदोलनं सरकार पुरस्कृत असल्याचा आरोपही विरोधकांनी केला.



राज्य विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन उद्या सुरू होत असून अधिवेशनातील रणनिती ठरवण्यासाठी महाविकास आघाडीच्या नेत्यांची आज बैठक झाली. विधानसभेचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार, विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण, काँग्रेसचे बाळासाहेब थोरात, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे आमदार जयंत पाटील, शेकापचे जयंत पाटील आदी नेते बैठकीला उपस्थित होते.

बैठकीनंतर संयुक्त पत्रकार परिषदेत त्यांनी सरकारवर प्रखर टीका केली. राज्यातील शेतकरी दुष्काळ, पाणीटंचाई व अवकाळीचे चटके भोगत असताना मुख्यमंत्र्यांच्या चहापानास उपस्थित राहणे हा संकटात होरपळत असलेल्या शेतक-यांप्रती द्रोह ठरेल, अशी भूमिका घेत महाविकास आघाडीने घेत सरकारच्या चहापान कार्यक्रमावर बहिष्कार टाकला.

## वाचकांना वाढदिवसानिमित्ताने ग्रंथालयाशी जोडण्याचा उपक्रम अनोखा सुभाष जाधव यांचे प्रतिपादन

लातूर :- अडीच हजार वर्षांपूर्वी तथागतांनी जगाला दिलेला शांती,अहिंसा,प्रेम,मैत्री,करुणेचा विचार कृष्णाजी अर्जून केळूसकर या सत्यशोधकी कुणबी विचारवंताने सव्वाशे वर्षांपूर्वी पुन्हा गौतम बुध्दाचे चरित्र रेखाटून या देशात धम्माचे पुनरुज्जीवन केले.नव्हे तो ग्रंथ बाबासाहेबांना चौथी पास झाल्यानंतर भेट दिला आणि तो मानवतेचा विचार पुन्हा बाबासाहेबांनी बुध्द आणि त्यांचा धम्म ग्रंथारुपाने जगाला दिला, म्हणजे सत्य,ज्ञान पुन्हा पुन्हा उसळून पुढे येते असे सांगून,जगात धनापेक्षा ज्ञानाला अधिक महत्व आहे.बालवाचकाचा वाढदिवस वृक्षरोप देवून साजरा करण्याचा ग्रंथालयाचा उपक्रम स्तुत्य असल्याचे प्रतिपादन सामाजिक कार्यकर्ते सुभाष जाधव यांनी येथे केले. लातूर येथील स्वातंत्र्य सैनिक नगरातील सम्राट अशोक सार्वजनिक वाचनालयाच्या विस्तारीत वाचनकक्ष अभ्यासिकेत आज गुरुवारी बालवाचक संघर्ष तुकाराम रोकडे याचा वाढदिवस साजरा करण्यात आला. त्यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून जाधव बोलत होते.अध्यक्षपदी वैद्यराज तुकाराम रोकडे हे होते.प्रारंभी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करुन,केक कापून,वृक्षरोप भेट देवून,वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यात आल्या,यावेळी जाधव यांना केळुसकर लिखित गौतम बुध्दाचे चरित्र, बाबासाहेब आंबेडकर लिखित बुध्द आणि त्यांचा धम्म ग्रंथ देवून स्वागत करण्यात आले. पुढे बोलताना सुभाष जाधव म्हणाले की,आज जगाला युध्दाची नव्हे,बुध्दांच्या शांतीची गरज भासत आहे.शांतीनेच विकासाची वाटचाल दमदारपणे करता येते,पण बहुजन समाजाला नको त्या सनातनी,काल्पनिक,थोतांडाच्या मागे लावून ज्ञान,चिकित्सक विचारापासून जाणीवपूर्वक दूर ठेवण्याचे कारस्थान हजारो वर्षांपासून चालू आहे,ते कारस्थान हाणून पाडण्यासाठी बहुजन समाजाने आता तथागत बुध्द,संत कबीर,संत तुकाराम,छ. शिवराय,राजर्षी शाहू महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर,अण्णाभाऊ साठे,संत गाडगे महाराज यांच्या चरित्राचे पारायण,चिंतन करावे,आपल्या प्रगतीला बाधक संस्कृती गाडून टाकावी,ती काळाची गरज आहे असे सांगून त्यांनी वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. अध्यक्षीय समारोपात तुकाराम रोकडे यांनी मुलांना चांगले साहित्य दिल्यास त्यांच्यामध्ये वाचनाची गोडी लागून वाचन संस्कृती वाढेल,असे मत व्यक्त केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक सूत्रसंचालन वाचनालयाचे सचिव बाळकृष्ण होळीकर यांनी केले.कवी प्रदीप कांबळे यांनी आभार मानले,याप्रसंगी बी.जी.बनसोडे,दशरथ सूर्यवंशी,मारुती सूर्यवंशी,कोंडिबा उजळंबे,पत्रकार लिंबराज पन्हाळकर,गुत्तेदार राजू मस्के आदिंची उपस्थिती होती.



## आमदार रवींद्र धंगेकर ललित पाटील प्रकरणावरून आक्रमक

नागपूर : गेल्या काही दिवसांपूर्वी पुण्यातील ससून रुग्णालतून आरोपी ललित पाटील ड्रग्ज रॅकेट चालवत असल्याचे प्रकरण समोर आले होते. ललित पाटील याला पोलिसांनी ताब्यात घेऊन आता चौकशी सुरू केली आहे. आता हे प्रकरण हिवाळी अधिवेशनात चांगलेच गाजणार आहे. पुण्याचे आमदार रवींद्र धंगेकर यांनी विधिमंडळाच्या अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी सरकारचे लक्ष वेधले आहे.आमदार रवींद्र धंगेकर यांनी विधान भवन परिसरात ललित पाटील याला संरक्षण देणा-या मंत्र्यांवर कारवाई झालीच पाहिजे, अशी मागणी केली आहे. गेल्या काही दिवसांपासून आमदार धंगेकर यांनी ही मागणी लावून धरली आहे. यामुळे आता हिवाळी अधिवेशनातही या मुद्यावरून राजकीय वातावरण तापणार असल्याचे दिसत आहे.ससून रुग्णालयातील तत्कालीन अधिष्ठाता यांच्यावर असलेला राजकीय वरदहस्त या प्रश्नाकडे आमदार धंगेकरांनी लक्ष वेधले आहे. यावेळी माध्यमांसोबत बोलताना आमदार रवींद्र धंगेकर म्हणाले, ललित पाटील या आरोपीने ससून रुग्णालयात उपचार घेत असताना ड्रग्ज रॅकेट चालवले आहे. याबाबत आम्ही कारवाईची मागणी केली आहे.ललित पाटील याला नऊ महिने चांगली सेवा दिली. पोलिस, डॉक्टरांशी संगनमत ठेवून त्याने अवैध धंदा सुरु ठेवला. यात त्याने करोडो रुपयांचा व्यवहार केला. आम्ही आवाज उठवूनही संजीव ठाकूर यांना अटक केलेली नाही, संजीव ठाकूर यांना अटक झाल्यानंतर ज्या, ज्या मंत्र्यांनी फोन केला त्याचा तपास झाला पाहिजे, कारवाई झाली पाहिजे, अशी मागणी आमदार धंगेकर यांनी केली.हातात स्टेथोस्कोप, अंगावर ॲप्रन रवींद्र धंगेकर हे स्टेथोस्कोप आणि ॲप्रन घालून डॉक्टरांच्या वेशभूषेत विधानभवनात पोहोचल्यावर त्यांनी सर्वांचे लक्ष वेधून घेतले. तसेच, त्यांच्या ॲप्रनवर 'ललित पाटील याला संरक्षण देणा-या मंत्र्यांवर कारवाई झालीच पाहिजे' असे लिहिण्यात आल्याचे पाहायला मिळाले. त्यामुळे मागील काही दिवसांपासून ललित पाटील प्रकरणात आक्रमक होणारे ललित पाटील आता अधिवेशनात देखील आक्रमक भूमिका घेताना पाहायला मिळण्याची शक्यता आहे.

## आ. कराड यांच्या प्रयत्नातून मुरुड उपजिल्हा रुग्णालय इमारत बांधकामास २५ कोटी ४७ लाखाचा निधी मंजूर

लातूर : - लातूर तालुक्यातील मुरुड येथील उपजिल्हा रुग्णालय इमारतीच्या बांधकामासाठी भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या प्रयत्नातून २५ कोटी ४७ लक्ष रुपयाचा निधी महाराष्ट्रातील महायुतीच्या शासनाने डिसेंबर २०२३ पुरवणी अर्थसंकल्पात तरतूद करण्यात आली असून त्यापैकी २०२३-२४ या वर्षाकरीता १ कोटी ५४ लक्ष ७४ हजार रुपयाचा निधी मंजूर केला आहे. सदरील निधी मंजूर झाल्याने प्रत्यक्ष बांधकामाला सुरुवात होणार आहे.

लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील मुरुड येथील ३० खाटांच्या ग्रामीण रुग्णालयाचे ५० खाटाच्या उपजिल्हा रुग्णालयात श्रेणीवर्धन विशेष बाब म्हणून गेल्या ४ जुलै २०२२ रोजी मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या नेतृत्वातील सरकारने मान्यता दिली. मुरुड येथे उपजिल्हा रुग्णालय कार्यान्वित व्हावे यासाठी सातत्याने पाठपुरावा करणारे आ. रमेशआप्पा कराड यांनी निधीची तरतूद व्हावी यासाठी संबंधित मंत्री महोदय आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांना लेखी, तोंडी वेळोवेळी मागणी करून पाठपुरावा केला. केलेल्या पाठपुराव्यामुळे सदर उपजिल्हा रुग्णालयाचा प्रस्ताव ११ जुलै २०२३ रोजी झालेल्या उच्चाधिकार सचिव समितीच्या बैठकीत २५.४७ कोटी रुपये खर्चाच्या प्रस्तावास सहमती दर्शविली. उच्चस्तरीय समितीच्या शिफारशीनुसार मुरुड उपजिल्हा रुग्णालय इमारत बांधकाम अंदाजपत्रकास १ ऑगस्ट २०२३ रोजीच्या परिपत्रकानुसार प्रशासकीय मान्यता देण्यात आली.

प्रशासकीय मान्यतेनंतर लवकरात लवकर मुरुड उपजिल्हा रुग्णालयाच्या इमारत बांधकाम व इतर कामाकरिता अंदाजपत्रकानुसार निधी उपलब्ध व्हावा याकरिता आ. रमेशआप्पा कराड यांनी राज्याचे मुख्यमंत्री, आरोग्य मंत्री, संबंधित वरिष्ठ अधिकारी यांच्याकडे वेळोवेळी पाठपुरावा केला. केलेल्या पाठपुराव्यामुळे सदर कामासाठी २५ कोटी ४७ लाख रुपयेची डिसेंबर २०२३ पुरवणी अर्थसंकल्पात तरतूद करण्यात आली असून त्यापैकी २०२३-२४ या वर्षाकरीता १ कोटी ५४ लक्ष ७४ हजार रुपयाचा निधी उपलब्ध करून दिला आहे. सदरील निधी मंजूर झाल्याने मुरुड उपजिल्हा रुग्णालय इमारतीचे प्रत्यक्ष बांधकाम लवकरच सुरू होणार आहे.

मागणी केल्यानुसार निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल आ. रमेशआप्पा कराड यांनी राज्याचे मुख्यमंत्री ना. एकनाथजी शिंदे साहेब, उपमुख्यमंत्री मा. देवेंद्रजी फडणवीस साहेब, उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री मा. अजितदादा पवार साहेब आणि राज्याचे आरोग्यमंत्री मा. तानाजी सावंत साहेब यांचे आभार व्यक्त केले आहेत.

मुरुड उपजिल्हा रुग्णालय इमारत बांधकाम होणार असल्याने मुरुड आणि परिसरातील ग्रामीण भागातील रुग्णालयांची मोठी गैरसोय



दूर होणार आहे. या कामासाठी वेळोवेळी पाठपुरावा करून निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल भाजपा नेते आ. रमेशआप्पा कराड यांचे भाजपाचे तालुकाध्यक्ष बन्सी भिसे, संजय गांधी निराधार योजना समितीचे अध्यक्ष वैभव सापसोड, मुरुडच्या सरपंच सौ. अमृता नाडे, उपसरपंच हनुमंतबापू नागटिळक, सुरज शिंदे, अनंत कणसे, लताताई भोसले, महेश कणसे, रवि माकुडे, विशाल कणसे, वैजनाथ हराळे, रवि नाडे, रमाकांत गायकवाड, जनक इंगळे, विश्वास कावळे, काशीनाथ ढगे, बालाजी दुटाळ, शुभम खोसे, दत्ता पोटभरे, आकाश सापसोड, रमजान सय्यद यांच्यासह मुरुड आणि परिसरातील भाजपाचे पदाधिकारी, लोकप्रतिनिधी आणि कार्यकर्त्यांनी आभार व्यक्त केले आहेत.

## मुरुड उपजिल्हा रुग्णालयाच्या उभारणीला मिळणार गती

लातूर : 'लातूर ग्रामीण'चे आमदार श्री. धिरज विलासराव देशमुख यांच्या प्रयत्नांमुळे मुरुड येथील उपजिल्हा रुग्णालयाच्या नवीन इमारतीच्या बांधकामाला आता गती मिळणार आहे. यासाठी मान्यता मिळालेल्या २५.४७ कोटी रुपयांच्या निधीपैकी पहिल्या टप्प्यात १ कोटीचा निधी चालू वर्षासाठी पुरवणी अर्थसंकल्पात मंजूर झाला आहे.मुरुड येथील ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. त्यामुळे येथे उपजिल्हा रुग्णालय व्हावे यासाठी आमदार श्री. धिरज देशमुख यांनी पुढाकार घेतला होता.



तत्कालीन महाविकास आघाडी सरकारने त्यांच्या मागणीची दखल घेत येथील ग्रामीण रुग्णालयाचे रूपांतर ५० खाटांच्या उपजिल्हा रुग्णालयात करण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर या रुग्णालय उभारणीसाठी निधी मिळावा यासाठीही आमदार श्री. धिरज देशमुख हे सातत्याने प्रयत्नशील होते. यामुळे उपजिल्हा रुग्णालयाच्या नवीन इमारतीच्या बांधकामाला आता चालना मिळणार आहे.या निर्णयामुळे ग्रामीण भागातील रुग्णांची मोठी सोय होणार आहे. त्यांना उपचार घेण्यासाठी शहरात येण्याची गरज भासणार नाही. त्यामुळे आमदार श्री. धिरज देशमुख यांनी महाविकास आघाडी बरोबरच मुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री श्री. अजित पवार, आरोग्यमंत्री श्री. प्रा. तानाजी सावंत, पालकमंत्री श्री. गिरीश महाजन यांचे आभार मानले.

## कास्ट्राईब कर्मचारी महासंघाच्या वतीने विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन

लातूर :- विश्वरत्न बोधीसत्व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त लातूर शहरातील आंबेडकर पार्क येथील पुतळयास पुष्पहार अर्पण करुन कास्ट्राईब कर्मचारी महासंघाच्या वतीने अभिवादन करण्यात आले. यावेळी कास्ट्राईब कर्मचारी महासंघ, लातूरचे जिल्हा अध्यक्ष नितीन बनसोडे, सरचिटणीस अशोक माळगे, उपाध्यक्ष गणेश राठोड, कोषाध्यक्ष प्रशांत म्हेत्रे, जिल्हा संघटक नागरत्न कांबळे, दैनिक महावृत्तचे संपादक अशोक हानवते, ड.धम्मदीप बलांडे, निलराज बनसोडे, राहूल गायकवाड,सुभाष मस्के, रवी उदगीरकर, महेंद्र कांबळे यांच्यासह असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.




## लातूर ग्रामीण मधील ३ रस्त्याच्या कामासाठी आ. कराड यांच्या प्रयत्नातून २० कोटीचा निधी

लातूर :- लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील ३ रस्त्याच्या कामाकरिता डिसेंबर २०२३ उर्वरित अर्थसंकल्पात आ. रमेशआप्पा कराड यांच्या प्रयत्नातून तब्बल २० कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. तिन्ही रस्त्याला निधी प्राप्त झाल्याने अनेक दिवसापासूनची त्या त्या भागातील नागरिकांची मोठी गैरसोय दूर होणार आहे.

लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील अनेक रस्ते खराब झाल्याने वाहनधारकासह सर्वसामान्य जनतेला मोठा त्रास सहन करावा लागत असल्याने विविध रस्त्यांना दुरुस्ती कामाकरिता निधी मिळावा, सदर रस्त्यावरील पुल आणि नाल्याचे नव्याने बांधकाम व्हावे यासाठी शासनाने निधी उपलब्ध करून द्यावा अशी मागणी भाजपाचे नेते आ, रमेशआप्पा कराड यांनी राज्याचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, अर्थमंत्री आणि सार्वजनिक बांधकाम मंत्री यांना लेखी निवेदनाद्वारे केली होती.

रस्त्याच्या कामासाठी आ. रमेशआप्पा कराड यांनी वेळोवेळी पाठपुरावा केल्याने लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील तीन रस्त्याचा डिसेंबर २०२३ पुरवणी अर्थसंकल्पात समावेश करून या तीन रस्त्याच्या कामाला तब्बल वीस कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला आहे त्यानुसार लातूर तालुक्यातील गुंफावाडी - निवळी - ढाकणी - एकुर्गा - सावरगाव - गंगापूर - वासनगाव प्रजीमा ११ या रस्त्याची सुधारणा कामाकरिता ६ कोटी रुपये; रेणापुर तालुक्यातील एन. एच. ५४८ बी - गव्हाण - ब्रह्मवाडी - दर्जीबोरगाव - इंदरठाणा - आरजखेडा - साई - महापूर - जवळगा - सेलु (ख)- एन. एच. ६३ - रामवाडी - एस. एच. २४८ - कुंभारवाडी - धवेली या रस्त्यावरील पूल, नाली दुरुस्तीसह रस्त्याच्या दुरुस्ती कामाकरिता ९ कोटी रुपये; लातूर तालुक्यातील प्रजिमा ५ रामेश्वर - लमानतांडा - प्रजीमा १३- चिंचोली ब. - प्रजिमा ९ - रामेगाव - रामा ६३ पर्यंत पुलाच्या बांधकामासह रस्त्याच्या दुरुस्ती कामाकरिता ५ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे.



अनेक दिवसापासूनचा रस्त्याचा प्रश्न निकाली निघाला असून या रस्त्याच्या कामाकरिता निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल राज्याचे मुख्यमंत्री मा. एकनाथजी शिंदे, उपमुख्यमंत्री मा. देवेंद्रजी फडणवीस, उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री मा. अजितदादा पवार आणि तिन्ही रस्त्याच्या कामाला निधी मिळावा याकरिता वेळोवेळी पाठपुरावा केल्याबद्दल भाजपा नेते आ. रमेशआप्पा कराड यांचे त्या त्या भागातील भाजपाचे पदाधिकारी, लोकप्रतिनिधी, कार्यकर्त्यांसह नागरिकांनी आभार व्यक्त केले आहेत.


दैनिक महावृत्त पहा ऑनलाईन कोठेही mhavratt.com या वेबसाईटवर पाहता येणार

## संपादकीय....

# सूक्ष्म सिंचनाला जलनियमनाची जोड हवी!

खऱ्या अर्थाने बचत करण्यासाठी पाणीवाटपाचे आणि वापराचे नियंत्रण आणि नियमन करणाऱ्या यंत्रणेचे अस्तित्व ही पूर्वअट आहे सचिन तिवले यंदाचे वर्ष दुष्काळाचे असणार आहे. या पार्श्वभूमीवर पाण्याच्या बचतीसाठी मोठया प्रमाणात वापरल्या गेलेल्या आणि शासनाच्या विविध योजनांमधून पुरस्कृत केल्या जाणाऱ्या सूक्ष्म सिंचनाची दुसरी बाजू जाणून घेणे आणि त्यानुसार नियोजन करणे अपरिहार्य आहे.. पाण्याची बचत करण्यासाठी काही दशकांपासून केंद्र आणि राज्य सरकारे विविध योजनांतर्गत सूक्ष्म सिंचनास (ठिबक आणि तुषार) प्रोत्साहन देत आहेत. सिंचनासाठी वापरलेल्या अतिरिक्त पाण्याची बचत आणि पाण्याचा कार्यक्षम वापर करण्याचे साधन म्हणून सूक्ष्म सिंचनाकडे पाहिले जाते. सूक्ष्म सिंचनावर भर देणारा 'पर ड्रॉप मोअर क्रॉप' (पीडीएमसी) हा प्रधानमंत्री कृषी सिंचाई योजनेच्या (पीएमकेएसवाय) चार प्रमुख घटकांपैकी एक घटक आहे.सूक्ष्म सिंचनाला चालना देताना धोरणकर्त्यांची अशी अपेक्षा असते की एकूणच जागतिक स्तरावर आणि भारतात पाण्याचा सर्वाधिक वापर करत असलेल्या सिंचन क्षेत्रात पाण्याची बचत व्हावी आणि हे वाचलेले पाणी इतर वंचित शेतकरी आणि पाण्याची वाढती मागणी करणारी क्षेत्रे उदा. शहरी पाणीपुरवठा, उद्योग आणि ऊर्जा यांसाठी उपलब्ध करून देता यावे, याच हेतूने, 'पर ड्रॉप मोअर क्रॉप'च्या (पीडीएमसी) मार्गदर्शक तत्त्वांमध्ये पाणीटंचाईग्रस्त आणि भूजलाची गंभीर स्थिती असलेल्या जिल्हा आणि तालुक्यांमध्ये सूक्ष्म सिंचनावर प्रामुख्याने भर द्यावा, असे नमूद आहे. परंतु, फक्त सूक्ष्म सिंचनाचा अवलंब केल्यामुळे पाण्याची बचत होत नाही. खऱ्या अर्थाने बचत करण्यासाठी पाणीवाटपाचे आणि वापराचे नियंत्रण आणि नियमन करणाऱ्या यंत्रणेचे अस्तित्व ही पूर्वअट आहे. अन्यथा या लेखात स्पष्ट केल्याप्रमाणे, पाण्याची बचत तर होत नाहीच, पण भूजलाची पातळी आणखी खालावणे आणि नद्या, तलाव व पाणथळ जमिनीतील (वेटलँड्स) पाणीसाठा कमी होणे हे धोके उद्भवतात.पाणीबचत मोजण्याचा स्तर सूक्ष्म सिंचनामुळे शेताच्या पातळीवर पाण्याची बचत होते, पण तीच बचत नदीखोरे स्तरावर (वा जलधरांच्या (ॲक्विफर) स्तरावरसुद्धा) होईलच याची खात्री देता येत नाही. पाण्याची बचत होते की नाही, आपण ती कोणत्या स्तरावर मोजतो यावर ठरते. दिलेल्या पाण्यापैकी जे पाणी पीक स्वत:च्या वाढीसाठी वापरत नाही ते वाया गेले असे आपण मानतो. या तर्काला अनुसरून, पारंपरिक सिंचन पद्धत (फ्लड इरिगेशन) ही जमिनीत झिरपून 'वाया जाणाऱ्या' अतिरिक्त पाण्यामुळे अकार्यक्षम मानली जाते. तथापि, या वाया जाणाऱ्या पाण्याचा काही भाग जलधरात झिरपतो आणि भूजलाचे पुनर्भरण करतो किंवा खालच्या बाजूला नदीच्या प्रवाहात योगदान देतो– ज्याला जलविज्ञानाच्या परिभाषेत 'कृषी परतावा प्रवाह' (ॲग्रिकल्चरल रिटर्न फ्लो) म्हणून संबोधले जाते. या कृषी परतावा प्रवाहाच्या माध्यमातून उपलब्ध पाणी त्या नदीखोऱ्यातील किंवा त्याच जलधरावर अवलंबून असलेल्या इतर पाणी वापरकर्त्यांद्वारे उत्पादक हेतूंसाठी पुन्हा वापरले जाते. अशा प्रकारे, जलधर किंवा नदीखोरे स्तरावर, हे वाया जाणारे पाणी प्रत्यक्षात फायदेशीर असते कारण या पाण्याचा खोऱ्याच्या खालच्या भागातील इतर घटकांकडून पुनर्वापर केला जातो. सूक्ष्म सिंचन लागू केल्यानंतर 'कृषी परतावा प्रवाह' लक्षणीयरीत्या कमी होतो आणि त्यावर अवलंबून असलेल्या पाणी वापरकर्त्यांना त्याचा फटका बसतो.याउलट, पारंपरिक सिंचन पद्धतीत, सिंचनाची शेतीच्या पातळीवर कार्यक्षमता कमी असली तरी, या पद्धतीने उपलब्ध करून दिलेल्या कृषी परतावा प्रवाहाचा पुनर्वापर लक्षात घेतल्यास, नदीखोरे पातळीवर पाणीवापराची कार्यक्षमता वाढलेली दिसते. सूक्ष्म सिंचनाशी निगडित पाणीबचतीची चर्चा करताना, बचतीचे मोजमाप कोणत्या स्तरावर केले आहे हे पाहणे महत्त्वाचे ठरते. ज्या ठिकाणी कृषी परतावा प्रवाहाचा पुनर्वापर हा जलधर क्षाराच्या अतिरिक्त प्रमाणामुळे दूषित झाल्यामुळे किंवा नदीच्या खालच्या भागातील प्रवाह थेट समुद्रात जात असल्यामुळे शक्य नसतो, त्या ठिकाणी सूक्ष्म सिंचनातून होणारी पाण्याची बचत ही खरी बचत असते.ओलिताखालील क्षेत्रवाढ आणि पुनर्वाटप शेतकरी सूक्ष्म सिंचनाचा अवलंब केल्यानंतर पाण्याचा वापर कमी करत नाहीत, असे सूक्ष्म सिंचनावरील विविध अभ्यास दर्शवितात. परिणामी इतर गरजा भागविण्याच्या दृष्टीने पाण्याची बचत होत नाही आणि इतर स्रोतांवरील ताण कमी होत नाही, (उदा. भूजल). उदा.– 'नॅशनल मिशन ऑफ मायक्रो इरिगेशन' (एनएमएमआय) या योजनेला आठ वर्षे पूर्ण झाल्यानंतर २०१४ मध्ये भारत सरकारच्या कृषी मंत्रालयाने, या योजनेच्या परिणामांचा अभ्यास केला. या अभ्यासाअंतर्गत १३ राज्यांमधील ६४ जिल्ह्यांतील निवडक ७४०० लाभार्थी आणि गैर–लाभार्थी शेतकऱ्यांचा समावेश होता. या अभ्यासात 'एनएमएमआय' या योजनेचे एकूण सात फायदे निदर्शनास आले. यापैकी सर्वात प्रथम नमूद केलेला फायदा होता, सूक्ष्म सिंचनाच्या वापरामुळे संबंधित पाण्याच्या स्रोतातून झालेली सिंचन क्षेत्रातील वाढ! अभ्यासातील आकडेवारी असे सांगते की लाभार्थी शेतकऱ्यांनी सूक्ष्म सिंचनाद्वारे पाण्याची बचत करून तेवढय़ाच उपलब्ध पाण्यामध्ये सरासरी ८.४ टक्के अतिरिक्त जमीन सिंचनाखाली आणली. ही टक्केवारी महाराष्ट्रासाठी सर्वाधिक म्हणजे २२.३ टक्के होती. काही ठिकाणी तितकेच पाणी वापरून पीक लागवडीच्या सघनतेत (क्रॉपिंग इन्टेन्सिटी) वाढ झालेली दिसून आली. यावरून असे दिसते की, सूक्ष्म सिंचनाचा वापर केल्यानंतरसुद्धा शेतकरी भूजल व इतर स्रोतांमधून पूर्वीइतकेच पाणी वापरतात आणि पाण्याच्या वापरात कोणत्याही प्रकारची बचत होत नाही.या सर्व प्रकारांत मात्र कृषी परतावा प्रवाह कमी होतो. कारण ठिबक आणि तुषार सिंचनामुळे जमिनीत झिरपणाऱ्या पाण्याचे प्रमाण कमी होते आणि त्यामुळे नदीखोऱ्याच्या खालच्या भागात कृषी परतावा प्रवाहामार्फत मिळणारे पाणी लक्षणीयरीत्या कमी होते. यामुळे खोऱ्यातील पाण्याचे अप्रत्यक्षरीत्या पुनर्वाटप होण्यास खीळ बसते. पूर्वी जे पाणी खालच्या भागातील शेतकरी आणि इतर पाणी वापरकर्ते कृषी परतावा प्रवाहाच्या माध्यमातून वापरत होते, ते पाणी आता सूक्ष्म सिंचनानंतर वरच्या भागातील शेतकरी वापरू लागतात. प्रधानमंत्री कृषी सिंचाई योजनेद्वारे जेव्हा आपण अधिकाधिक शेतकऱ्यांना सबसिडी देऊन सूक्ष्म सिंचनाचा अवलंब करण्यास प्रवृत्त करतो, तेव्हा आपण अप्रत्यक्षपणे पाण्याचे पुनर्वाटप करून खोऱ्याच्या खालच्या भागातील वापरकर्त्यांना पाण्यापासून वंचित ठेवतो. पाणीवाटपाचे आणि वापराचे नियमन सूक्ष्म सिंचन तंत्रज्ञानाचा वापर केल्याने आपोआप पाण्याचा वापर कमी होत नाही.

# सार्क परिषद: रचना व कार्यप्रणाली!

(सार्क परिषद स्थापन दिन.)

पार्श्वभूमी: दक्षिण आशियाई देशांनी एकत्रित येऊन स्थापन केलेली संघटना. या देशांनी एप्रिल १९४७ ते डिसेंबर १९८५ या काळात प्रदीर्घ चर्चा करून दिनांक ८ डिसेंबर १९८५ रोजी सार्क संघटनेची ढाका येथे स्थापना केली. या बाबतीत बांगला देशाचे तत्कालीन अध्यक्ष जनरल इर्शाद यांनी अंतिम पुढाकार घेतला होता. सुरुवातीला भारत, बांगला देश, श्रीलंका, मालदीव, पाकिस्तान, भूतान आणि नेपाळ हे सात देश या संघटनेचे सदस्य होते. दक्षिण आशियातील देशांचे समाजकल्याण आणि तेथील लोकांचा जीवनविकास, आर्थिक स्थितीत सुधारणा इत्यादी उद्दिष्टे समोर ठेवून ही संघटना तयार केली गेली. या सर्व देशांनी त्या वेळी कृषी, ग्रामीण विकास, दूरसंचार, हवामान, आरोग्य आणि लोकसंख्यावाढ या क्षेत्रांत एकात्मिक कृतिकार्यक्रम राबविण्याचे ठरविले. सार्कच्या स्थापनेनंतर अनेक देश या संघटनेत सदस्य किंवा निरीक्षक म्हणून सहभागी होण्यासाठी प्रयत्नशील होते. बऱ्याच वादावादीनंतर एप्रिल २००७ मध्ये अफगाणिस्तानला आठवा सदस्यदेश म्हणून या संघटनेत प्रवेश देण्यात आला. सध्या ऑस्ट्रेलिया, चीन, इराण, जपान, मॉरिशस, म्यानमार, दक्षिण कोरिया, अमेरिका हे आठ देश आणि युरोपियन युनियन ही संघटना यांना निरीक्षक देश म्हणून दर्जा देण्यात आला आहे. म्यानमारला लवकरच पूर्ण सदस्यत्व दिले जाईल, तर रशिया, दक्षिण आफ्रिका आणि टर्की हे देश निरीक्षक देशाचा दर्जा मिळावा म्हणून प्रयत्नशील आहेत.

रचना व कार्य: नेपाळची राजधानी काठमांडू येथे १६ जानेवारी १९८७ रोजी सार्कच्या सचिवालयाची स्थापना करण्यात आली. सार्कच्या सरचिटणीसची नियुक्ती सदस्य देशांमधून आळीपाळीने केली जाते. सदस्यदेशांमधल्या विविध शहरांतून विविध समित्यांमार्फत सार्कचे काम चालते. सार्कची वार्षिक परिषद वर्षातून एकदा देशांच्या नावाच्या आकारविल्हेनुसार त्या–त्या देशात भरते. तत्पूर्वी या देशांच्या परराष्ट्रमंत्र्यांची वर्षातून दोनदा बैठक होते आणि त्या बैठकीला सदस्यदेशांचे राष्ट्रप्रमुख– पंतप्रधान उपस्थित राहतात. पूर्वी सदस्यदेशांतील मतभेदांमुळे या बैठका सौहार्दपूर्ण वातावरणात होत नसत. पाकिस्तान दहशतवाद्यांना देत असलेल्या पाठिंब्यामुळे आणि भारतात उरी येथील लष्करी तळावर झालेल्या हल्ल्यानंतर भारत, बांगला देश, भूतान आणि अफगाणिस्तान या देशांनी नोव्हेंबर २०१६मध्ये पाकिस्तानात होणा–या सार्कच्या बैठकीवर बहिष्कार घातला होता. त्यामुळे ही बैठकच रद्द करावी लागली. सदस्यदेशांच्या अंतर्गत वादाचा सार्कच्या कामावर परिणाम होऊ नये, म्हणून सार्कच्या बैठकीत युद्ध किंवा दोन देशांमधील संघर्ष यावर सहसा चर्चा होत नाही. पण संबंधित देशांना या बैठकीच्या वेळी परस्पर चर्चा करण्याची संधी सार्क देते. सार्कच्या शिखर परिषदांमध्ये दहशतवादाविरुद्ध लढण्यासाठी सदस्यराष्ट्रांच्या व्यापक सहकार्यावर नेहमीच भर देण्यात आला आहे. २०१५च्या आकडेवारीनुसार सार्कमध्ये जगाच्या क्षेत्रफळाच्या ३ टक्के भूभाग समाविष्ट होता, तर जगाच्या लोकसंख्येच्या २१ टक्के लोकसंख्या या देशांची होती. सदस्यदेशांमध्ये आर्थिक आणि क्षेत्रीय सहकार्य वाढावे यासाठी सार्क नेहमीच प्रयत्नशील असते. निरीक्षक या नात्याने सार्कचे संयुक्त राष्ट्रसंघाशी कायमस्वरूपी राजनैतिक संबंध आहेत. युरोपियन युनियन व अन्य अनेक आंतरराष्ट्रीय संघटनांबरोबर सार्कने मैत्रीपूर्ण संबंध ठेवले आहेत. सार्कने अल्पकाळात विविध आघाड्यांवर लक्षणीय प्रगती केली आहे. दक्षिण आशियाई मुक्त व्यापार क्षेत्र या सार्क अंतर्गत संघटनेची स्थापना सन २००६मध्ये करण्यात आली. सदस्यदेशांमधील व्यापारवृद्धीबाबत या संघटनेला चांगलेच यश मिळाले आहे. सार्क अंतर्गत देशांमधील प्रवासासाठी व्हिसाच्या २४ प्रकारांच्या अटी शिथिल करण्यात आल्या. महिला व बालकल्याण, शांतता, विकास, दारिद्र्य निर्मूलन, पर्यावरणरक्षण आणि प्रादेशिक सहकार्य या क्षेत्रांत सार्कच्या कामात सहकार्य करणाऱ्यांना अनेक पारितोषिके जाहीर करण्यात आली. सदस्यदेशांतील नामवंत लेखक आणि युवकांसाठीही सार्क पुरस्कार जाहीर करण्यात आले. सार्क देशांतील ऐक्य अधिक दृढ करण्यासाठी सार्कचे गीत तयार करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. भारताने सार्क देशातील संपर्कासाठी एक दळणवळण–उपग्रह देण्याचे मान्य केले आहे. या उपग्रहासाठी २३५ कोटी रुपये खर्च येणार असून तो सर्व खर्च भारतच देणार आहे. पाकिस्तानचा या योजनेला विरोध आाहे. त्यामुळे पाकिस्तान वगळता अन्य सार्क देशांनी या उपग्रहाचा वापर करण्याचे ठरविले आहे. सीमाविरहित ज्ञान असे घोषवाक्य असलेले एक दक्षिण आशियाई विद्यापीठ भारताने नवी दिल्ली येथे सुरू केले आहे. या विद्यापीठात अनेक विषयांतील संशोधनाची सोय असून अत्यंत समृद्ध असे ग्रंथालय उभे करण्यात आले आहे. सार्क आणि अन्य देशांतील विद्यार्थी सन २०१४पासून या विद्यापीठात शिक्षण घेत आहेत. सुमारे ७ हजार विद्यार्थी या विद्यापीठात शिक्षण घेऊ शकतील. संघटनेच्या सदस्यदेशांमध्ये या विद्यापीठाच्या संलग्न शाखा असतील व तेथेही या विद्यार्थ्यांना संशोधन करता येईल. नवी दिल्लीतील इग्नू विद्यापीठ आणि असोला अभयारण्य यांच्या दरम्यान या विद्यापीठासाठी १०० एकर जागा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

मूल्यमापन: भारत आणि अन्य सदस्यदेश यांची महत्त्वाची भूमिका असलेल्या अनेक जागतिक व प्रादेशिक संघटनांबरोबर सार्कचे मैत्रीपूर्ण संबंध आहेत. त्यामध्ये एशिया को–ऑपरेशन डायलॉग– एसीडी– ३४ देश, साऊथ एशिया सब रीजनल इकॉनॉमिक को–ऑपरेशन– एसएएसईसी– ६ देश, मेकाँग गंगा को–ऑपरेशन– एमजीसी– ६ देश, इंडियन ओशन रिम असोसिएशन– आईओआरए– २१ देश, बांगला देश, भूतान, भारत, नेपाळ सहकार्य– बीबीआईएन– ४ देश आणि बंगालच्या उपसागरानजीकच्या देशांची परिषद– बीआईएमएसटीईसी– ७ देश या संघटनांचा यात समावेश होतो. या संघटनांमुळे सार्कला स्थैर्य प्राप्त झाले आहे. दहशतवादाला उघडउघड पाठिंबा देणाऱ्या पाकिस्तानमुळे सार्कमध्ये मतभेद निर्माण झाले असून या भूप्रदेशातील शांततेला बाधा निर्माण झाली आहे.

अफगाणिस्तान हा मध्य आशियातील देश असल्यामुळे त्याला प्रवेश देताना सार्कच्या सदस्यदेशांमध्ये खूपच वाद झाले होते. दक्षिण आशियाई देश कुणाला म्हणायचे, यावरून हा वाद निर्माण झाला होता. सार्कमधील सर्वच देशांना विकासासाठी खूप वाव असल्याने अनेक देश निरीक्षक म्हणून या संघटनेत सहभागी झाले आहेत. धोरण आणि उद्दिष्टांची पूर्तता करण्याबाबत सार्कचा प्रभाव हा नेहमीच वादाचा विषय राहिला आहे.

!! दक्षिण आशिया सार्क परिषद स्थापना दिनाच्या सर्वांना हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!

**********

– संकलन –

श्री कृष्णकुमार गोविंदा निकोडे गुरूजी.
रामनगर वॉर्ड, गडचिरोली,
फक्त व्हॉट्सप– ९४२३७१४८८३.

# ईव्हिएम चा घोळ, कमळाला बळ..

ईव्हिएम जेव्हा पासून निवडणूक प्रक्रीयेत आली तेव्हा पासून प्रत्येक निवडणुकीत ईव्हिएम वर प्रश्न चिन्ह उपस्थित झाले आहे. लोकशाही मध्ये लोकांचे सरकार स्थापन करण्यासाठी सर्वात मोठे शस्त्र म्हणजे मताधिकार होय. मताधिकाराच्या जोरावर देशात सत्ता बनू शकते त्याच मताधिकाराच्या जोरावर सत्ता बदलू शकते. लोकांना लोकांच्या मतानुसार उमेदवार निवडून स्वतः च्या व सामाजिक समस्या सोडवण्यासाठी तसेच सरकारने ने जनकल्याणाचे धोरण आखूण सर्वांगीण विकास करण्यासाठी मताधिकार सर्वात महत्वाची भुमिका पार पाडत असते. कारण एक मत सत्तेत बदल घडवून आणु शकतो. परंतु ईव्हिएम आली आणि लोकांचा मताधिकार हिसकावून घेऊन लोकशाहीची हत्याच झाली असे म्हणणे वावगे ठरणार नाही. कारण ईव्हिएम च्या माध्यमातून मताची हेराफेरी करून प्रत्येक निवडणूक होत आहे व सत्ता स्थापन करत आहेत. निवडणूक केवळ औपचारिक झाली असून देशात कोणाची सत्ता असेल, जनतेचे प्रतिनिधी कोण असेल हे लोक नाही तर ईव्हिएम ठरवत आहे. निवडणूक केवळ औपचारिक झाल्याने व लोकांच्या मताची किंमत शुन्य झाल्याने लोक कल्याणाची कामे करण्याची गरज राजकीय पक्षांना वाटत नाही. मग तो राजकीय पक्ष सत्तेत असो वा विरोधात असो. म्हणुनच लोकांच्या समस्या वाढत जात आहेत तर उद्योगपती व खाजगी लोकांच्या हातात देशातील सर्व सत्ता एकवटत आहे. ही खुप गंभीर बाब आहे. ईव्हिएम हे इलेक्ट्रॉनिक डिव्हाईस असल्याने ते पुर्णपणे सुरक्षित आहे म्हणणे म्हणजे केवळ अज्ञान दाखवणे होय. दुसरी गोष्ट शैक्षणिक दृष्टीने प्रगत व वैज्ञानिक दृष्टिकोन असलेल्या आणि स्वतः ईव्हिएम बनवलेल्या देशात निवडणूक प्रक्रियेत ईव्हिएम वापरली जात नाही. कारण ईव्हिएम मध्ये अनेक प्रकारचे घोळ करता येतात. आज पर्यंत ईव्हिएम घोळाचे अनेक प्रकरणे समोर आले आहेत. २००९ च्या निवडणुकीत कॉग्रेस ने ईव्हिएम मध्ये घोळ करून निवडणूक जिंकली असा आरोप करून कॉग्रेस ला मताची चोरी करणारा पक्ष म्हणून कमळाच्या जेष्ठ नेत्यांनी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली. म्हणजे २००९ च्या निवडणुकीत ईव्हिएम मध्ये घोळ होऊ शकतो हे कमळावाल्यांनीच मान्य केले. लोकांना त्याबद्दल जागृती व फारशी माहिती नव्हती. परंतु नंतरच्या काळात तंत्रज्ञानाचा वाढता वापर, तंत्रज्ञाना बद्दल जागृती झाल्याने लोकांना इलेक्ट्रॉनिक्स डिव्हाईस व तंत्रज्ञानाची चांगली माहिती झाली आणि सोशल मिडीयाच्या माध्यमातून ती सर्वत्र प्रसारित व्हायला सुरुवात झाली. २०१४ पासून इव्हिएमच्या कमळाशी संबधीत उमेदवारांच्या खाजगी गाडी मध्ये, इव्हिएम कमळाशी संबधीत लोकांच्या घरांमध्ये सापडायला लागल्या. निवडणूक आयोगाचे काम असते निवडणूक प्रक्रीया हि विश्वसनीय व पारदर्शक व्हायला पाहिजे. परंतु निवडणूक आयोगाच्या ईव्हिएमच कमळासोबत असतील तर निवडणूक विश्वसनीय व पारदर्शक कशी होणार? कोणतेही बटण दाबले तर कमळालाच मत जाते हा घोळही करून कमळाला बळ दिले जाते. आजपर्यंत इव्हिएम बिघाडाच्या बाबी कमी आणि जुगाडाच्या बाबी जास्त समोर आल्या आहेत. निवडणूक प्रक्रिया सुरू असताना असताना इव्हिएम मध्ये बिघाड होऊन निवडणूक थांबवण्याची वेळ अपवादात्मक आली असेल. पण प्रत्येक निवडणूकीत घोळ होतो हे आता कोणीही सांगत आहे. ईव्हिएम चोरीला जाणे, इव्हिएम हरवण्या सारखे बेजबाबदार कामे येथे केल्या गेले. २०१४ नंतर जे काही घोळ उघड झाले ते सर्वच्या सर्व कमळाशी संबधीत आहेत. आज लोकांचा इव्हिएम वर विश्वास राहला नाही, सोशल मिडिया व प्रत्यक्ष लोकांच्या मनात कमळाबद्दल आपुलकी, प्रेम तर दिसत नाही. परंतु कमळाच्या माध्यमातून प्रत्येक नागरिक किती त्रस्त आहे याची जाणीव होते. कमळाच्या सभेला प्रतिसाद मिळत नाही, कमळाच्या उमेदवारांना गावातून काढून दिले जाते, कमळाच्या उमेदवारांना कँमेरा समोर मारले जाते. अर्थात उमेदवारांना गावातून काढून देणे, वा प्रचारासाठी आलेल्या उमेदवारांना मारणे, त्यांचा अवमान करणे याचे मी वैयक्तिक समर्थन करत नाही. परंतु जनता कमळाच्या विरोधात असताना इव्हिएम मध्ये कमळाला मत जातात कसे? हा संशोधनाचा विषय आहे. अनेक वेळा कमळाशी संबधीत लोकांनी स्वतः च ईव्हिएम चे बटण दाबून लोकांना मताधिकारापासुन दुर ठेवले, कमळाच्या लोकांनी सर्वसामान्य लोकांवर कमळाचे बटण दाबण्यासाठी दबाव आणला, सर्व सामान्य जनतेला धमकावले, मारले अशा अनेक घटना सोशल मिडिया वर व्हायरल होत असताना जनाधार कमळाच्या विरोधात असताना इव्हिएम मध्ये कमळाला मते येतात कोठून? सत्तेचा गैरवापर करून अनेक वेळा स्ट्रॉगरुम मध्ये कमळाचे लोक इव्हिएम सोबत छेडछाड करतानाच्या बातम्या समोर आलेल्या आहेत. आताच झालेल्या निवडणुकी मध्ये स्ट्रॉगरुम च्या बाहेर सिसिटीव्ही कँमेऱ्यावर लक्ष ठेवून इव्हिएमची सुरक्षा सर्वसामान्य लोकांनी केली. ती सुरक्षा करताना स्ट्रॉगरुम मध्ये लावलेले सर्व सिसिटीव्ही कँमेरे एकाच वेळी सर्वच्या सर्व एका तासासाठी बंद होतात एका तासानंतर पुन्हा सर्वच्या सर्व सुरू होतात. हे लक्षण कशाचे आहे?जर स्ट्रॉगरुम मध्ये लावलेल्या सिसिटीव्ही कँमेरे एकाच वेळी बंद चालु होऊ शकतात तर इव्हिएम मध्ये एकाच वेळी घोळ कशावरून झाला नसेल? सर्वात सुरक्षित तंत्रज्ञान बँकिंग क्षेत्रात असते तेथेही फ्रॉड होऊन लोकांचे हजारो करोडो रुपये आजपर्यंत गायब झालेले आहेत. केवळ एखाद्या लिंकवर क्लिक केल्याने बँकखाते रिकामे होऊ शकते तर ईव्हिएम चा ताबा कमळाकडेच आहे. म्हणून घोळ घोणे साहजिकच आहे. अनेक राजकीय नेते व पक्षांनी इव्हिएम सुरक्षित नसल्याने आवाज उठवला आहे. सर्व जन इव्हिएमला विरोध करत असताना कमळाचे लोक इव्हिएमची बाजु का घेत असतील बरं? इव्हिएम कळमाचा कार्यकर्ता, पदाधिकारी आहे का? कमळाचा आणि इव्हिएमचा काय संबंध? जर संबंध नसेल तर सर्व जन म्हणतात इव्हिएमवर विश्वास नाही तर कमळावाले पेपरवर निवडणूक घेण्यासाठी का तयार होत नाहीत? तुम्ही बटण कोणतेही दाबा निवडून आम्हीच येणार असे कमळावाले उघडपणे बोलुनही इव्हिएम बंद का होत नसेल? वरील प्रश्न डोक्यात आले तर उत्तर एकच मिळते कमळाचे अस्तित्व लोकांच्या मतावर नाही तर इव्हिएम वर अवलंबून आहे. जर लोकांच्या मतावर अवलंबून असते. कमळाला इव्हिएमचा आधार का घ्यावा लागतो? इव्हिएम मध्ये घोळ करूनही मनाची शांती न झालेल्या कमळाच्या लोकांनी बँलेट पेपर ची पेटी फोडून मताची हेराफेरी केल्याचेही व्हिडीओ व्हायरल झाले आहेत. इव्हिएम विजयाचा कौल कमळाला देताना बँलेट पेपरवर झालेल्या मताचा कौल कमळाकडे नसतो. मग इव्हिएम मधुनच मताचा कौल कमळाला कसा मिळतो? कमळावाले मोठ्या मनाचे व लोकशाही ची जाण असणारे व लोकांच्या मताची कदर करणारे असतील तर सरकारने दबाव आणलेल्या मिडियाचे मत न बघता एकदा सोशल मिडिया वर सर्वसामान्य लोकांचे मत बघुन त्यांचा व लोकशाही चा आदर करून इव्हिएमवर निवडणूक घेणे बंद करून स्वतः च्या कामाच्या व विकासाच्या जोरावर पेपरवर निवडणूक घेऊन विजयी होऊन लोकांना लोकशाहीची जाणीव करून द्यावी. परंतु कमळावाले इव्हिएमच्या विरोधात बोलत नाहीत. इव्हिएम घोळाचे आरोप सर्व कमळावर असुनही कमळावर निवडणूक आयोग कारवाई करत नाही. उलट निवडणूक आयोगच स्वतः ला कमळाचा भाग समजतो म्हणून निवडणूक आयोगाच्या इव्हिएम कमळाच्या उमेदवारांकडे आढळून येतात. एवढ्या मोठ्या प्रमाणावर लोकांच्या मताची हेराफेरी करून लोकशाहीची हत्या केली जाते, भांडवलशाही ला जगवले जाते. याला केवळ इव्हिएम कारणीभुत आहे हेच दिसून येते. लोकशाही वाचवायची असेल तर ईव्हिएम बंद होणे आवश्यक आहे. जनतेचा इव्हिएमवर विश्वास नसेल तर निवडणूक आयोग इव्हिएम बंद का करत नाही? ईव्हिएम सर्वांना थोड थोड देऊन राजकीय पक्षांना शांत करून लोकशाहीची हत्या करत आहे. कोणी दोन चार पाच जागा निवडून आल्या म्हणून खुश होत आहे तर कोणी मताची टक्केवारी वाढली म्हणून खुश होत आहे, काही ठिकाणी कमळ स्वतः थोड्याफार फरकाने सत्ता दुसऱ्याला ही देत आहे म्हणजे इव्हिएम विरोधात कोणी उभे राहणार नाही. कमळाचा मिडिया लोकांचा इव्हिएम वर विश्वास बसावा म्हणून इव्हिएम मध्ये मताची चोरी झाली असती आणि कमळच जिंकले असते तर त्या ठिकाणी कमळ का नाही निवडून आले अश्या पद्धतीने मत व्यक्त करून कमळाप्रती असलेली गुलामीची श्रद्धा व्यक्त करून वैचारिक दिवाळखोरी करणाऱ्यांची संख्या कमी नाही. म्हणून इव्हिएम कमळाला बळ देत असेल तरीही देशाला व लोकशाहीला नेस्तनाबूत करत आहे. देशात लोकशाही टिकवायची असेल आणि जनकल्याणाचे कामे करायचे असतील तर इव्हिएमला विरोध करून सर्वसामान्य जागृत मानसाने रस्त्यावर येणे आवश्यक आहे. नाहीतर इव्हिएमच्या माध्यमातून आधुनिक गुलामी आपल्या समोर उभी आहे. जनता गरिब झाली आहे परंतु राजकीय पक्षाकडे करोडो रुपयांची संपती आहे, राजकीय नेते व त्यांचे मुल काहीच काम करत नाहीत तरीही ते करोडपती आहेत. सर्वसामान्य जनतेला एकवेळ खाण्याची चिंता आहे. दिवे लावण्याचा विक्रम करणाऱ्यां देशात त्याच दिव्यातील तेल बाटलीत भरून त्या तेलाचा वापर खाण्यासाठी करणारे व दिव्यातील तेल मिळावे म्हणून संघर्ष करणारे लोक याच देशात आहेत. समस्या केवळ सर्वसामान्य लोकांना आहेत. राजकीय पक्ष राजकीय नेते यांना कोणत्याही समस्या नाहीत. सर्व सामान्य लोकांकडे शाळेची फी भरायला पैसे नाहीत नेत्यांची मुल विदेशात शिकुन येतात. ही गोष्ट लक्षात घेणे आवश्यक आहे. आणि हे सर्व बदलायचे असेल तर एकच शस्त्र आहे आणि ते म्हणजे मताधिकार. याच मताधिकाराला वाचवण्यासाठी इव्हिएम विरोधात मोठे आंदोलन उभे राहणे आवश्यक आहे. तरच लोकशाही टिकेल. नाहीतर इव्हिएम कमळाला बळ देते. आणि येणाऱ्या काळात देश व जनता पुन्हा गुलामीत जाते.

**********

विनोद पंजाबराव सदावर्ते
समाज एकता अभियान
रा. आरेगांव ता. मेहकर
मोबा: ९१३०९७९३००

# महापरिनिर्वाण दिनानिमित्त भव्य आरोग्य शिबिर संपन्न

मुंबई/ प्रतिनिधी : – डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था पुणे, मान्यता प्राप्त संस्था प्रसंग मागासवर्गीय समाज कल्याण संस्था जयपूर तालुका, जी. वाशीम, मैनाबाई सोनबा जी मानकर बहु.उधेशिय संस्था ,बेलोरा जी येवतमाळ यांच्या संयुक्त विद्यमाने पंचशील मेडिकल असोसिएशन यांच्या मार्गदर्शनाखाली शिवाजी पार्क दादर मुंबई येथे डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना आदरांजली वाहण्यासाठी येणाऱ्या अनुयायी यांच्या साठीभव्य मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते यावेळी या शिबिराचे उदघाटन बंजारा क्रांती दलाचे राष्ट्रीय अध्यक्ष राकेश जाधव ,सर जे जे हॉस्पिटल चे वरिष्ठ वैद्यकीय अधिकारी तथा महत्मा फुले जीवनदायी योजनेचे संचालक डॉ रेवत कनिंदे यांच्या हस्ते संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. गजपाल इंगोले ,अमोल सोनबाजी मानकर प्रशासन अधिकारी अंबरनाथ नगरपालिका यांच्या उपस्थितीत केले ,यावेळी भारताच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या भीम अनुयायांच्या तपासणी डॉ. चन्ने तालुका वैद्यकीय अधिकारी, डॉ.भूषण साखरे वैद्यकीय अधिकारी, डॉ.रुपाली तायडे स्त्री रोग तज्ञ,हिरानंदानी हॉस्पिटल , डॉ.विलास अहिरे ई. एस.आई .एस. डॉ.प्रतीक देहाडे दंत रोग तज्ञ, डॉ.नागेश सेजव संचालक पालवी हॉस्पिटल ,डॉ.आनंद इंगोले जन. फिजिशियान, डॉ.अभिजित वानखेडे वैद्यकिय अधिकारी,डॉ,धीरज पाटोळे भौतिक उपचार तज्ञ, डॉ.रमेश देवके जन. फिजीशियान,डॉ.दिलीप अहिरे नेत्र तज्ञ, डॉ.दिलीप पाटील नेत्र तज्ञ,डॉ.प्रशांत गायकवाड





ई.एन टी ,डॉ . गोकुलदास अहिरे ई एन टी ,डॉ. बालाजी सातपुते अस्थी रोग तज्ञ यांनी तपासणी करून औषधे उपचार केले ,या वेळी डोळ्याची तपासणी करून २५० क्या वर मोफत चास्म्याचे वितरण ज्येष्ठ सहितिक तथा निवृत्त सेल टॅक्स अधिकारी ,प्रमोद बचाव निवृत्त कस्टम कमिशनर ,मुंबई विद्यापीठ माजी रजिस्ट्रार एस. टी.मोरे, यांचे हस्ते केले,यावेळी टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेस चे डॉ चंद्रमुख ,डॉ वैशाली इंगळे व इतर सहकारी यांनी यावेळी स्टॉल ला भेट देणाऱ्या युवकांना सामाजिक जाणीव व त्यांचे कर्तव्य तसेच करिअर संदर्भात मार्गदर्शन केले ,यावेळी मोकळं साहेब जी एस टी उपायुक्त,बोराडे साहेब, मंडपे साहेब,हे उपस्थित होते .संस्थेच्या या उपक्रमाला अरविंद सोनटाते आई अर एस ,गायकवाड साहेब पोलिस अधिकारी यांनी भेट देऊन शुभेच्या दिल्या या उपक्रमाला सचिन गायकवाड ,शशिकांत भालेराव , अधिकारी अंबरनाथ नगरपालिका ,मोरे सामाजिक कार्यकर्ते हिंगोली,संदीप इंगोले वाशीम आड.सतीश पंडित वाशीम यांनी भेट देऊन उपक्रमाची प्रशंसा केली ,पंचशील मेडिकल असोसिएशन क्या बऱ्याच डॉक्टरांनी यावेळी आपली सेवा दिली पुढील वर्षी अजून चांगली सेवा देण्याची ग्वाही दिली

# आम्ही लातूरकर विद्यापीठ निर्माण कृती समिती लातूर च्या वतीने लक्षवेधी उपोषण

लातूर :– आम्ही लातूरकर विद्यापीठ निर्माण कृती समिती लातूर च्या वतीने महात्मा गांधी चौक लातूर येथे महात्मा गांधी यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करून लक्षवेधी उपोषण आंदोलनास सुरूवात करण्यात आली आहे या उपोषणास मुख्यसंयोजक अँड प्रदिपसिंह गंगणे, बालाजीअप्पा पिंपळे, ताहेरभाई सौदागर, अजयसिंग राठोड, प्रा संगमेश्वर पानगावे, अतिश नवगिरे सहभाग नोंदवला आहे तर या आंदोलनास ज्येष्ठ पत्रकार अरुण समुद्रे, भाजप शहर जिल्हाध्यक्ष देविदास काळे, अँड ला रा शेख स्वाभिमानी मुस्लिम विकास परिषद, अँड उदय दाभाडे, डॉ रमेश बागडे, अँड फारुख पाशा शेख, शव्वेता उदरे, काँ विश्वभर भोसले, प्रसाद पवार सभाजी सेना विद्यार्थी जिल्हाध्यक्ष, राज धनगर, अँड अजय कलशेट्टी,अमजद पठाण भाजप, डॉ संजय जमदाडे, डॉ सिद्धार्थकुमार सुर्यवंशी, डॉ राजशेखर सोलापूरे,राष्ट्रवादी युवक काँग्रेस प्रदेश सरचिटणीस विशाल आवडे, जिल्हाध्यक्ष लालाभाऊ सुरवसे,




कार्याध्यक्ष आशिष कोकाटे, अँड सुनिल फावडे, संतुजी ब्रिगेडचे प्रदेश संघटक दिगंबर कांबळे, महेंद्र गायकवाड, हाश्मी मुंतोजनिद्दिन , प्राचार्य तयप्पा कांबळे, डॉ सितम सोनवणे, जाधव अनिकेत, अँड संतोष सोनी, अँड अनत शेटकार , मराठा क्रांती मोर्चाचे अनिल जाधव, अँड गुरुनाथ चरकपल्ले, राजकुमार पांचाळ, हरीचंद्र पांचाळ, गोविंद पांचाळ, शिवसेना उबाठा सौ सुनीता चाळक, अँड नरेश कुलकर्णी, तालुका प्रमुख अँड प्रविण मगर, शहरप्रमुख हेमलता पवार, पत्रकार संगम कोटलवार, बाळ होळीकर, देवा गडदे, संजय उदगिरे , कांनगुले , स्वामी सतिश , कासिम पठाण, महाराष्ट्र आर्यन सेना अविराजे निंबाळकर, काशिम पठाण, भीमराव दूनगावे आदींनी पाठिंबा दिला आहे

# ‘विकसित भारत संकल्प यात्रा’मुळे गावोगावी शासकीय योजनांचा जागर

लातूर, दि. ०७ (जिमाका) : केंद्र शासनाच्या विविध योजना समाजातील वंचित घटकांपर्यंत पोहचाव्यात, तसेच त्यांना या योजनांचा लाभ मिळावा, यासाठी ‘विकसित भारत संकल्प यात्रा’ ही विशेष मोहीम २४ नोव्हेंबर ते २६ जानेवारी २०२४ या कालावधीत लातूर जिल्ह्यात राबविली जात आहे. या मोहिमेंतर्गत जिल्ह्यातील ७८६ ग्रामपंचायतींमध्ये चित्ररथाद्वारे शासकीय योजनांची माहिती दिली जात असून लाभार्थ्यांना विविध लाभांचे वितरण, नाव नोंदणी करण्यात येत आहे. जिल्ह्यात ५ डिसेंबरपर्यंत २२१ गावांमध्ये ही संकल्प यात्रा पोहचली असून १ लाख १ हजार ७७४ नागरिकांनी यामध्ये सहभाग नोंदविला आहे. ग्रामीण भागासाठी जिल्हा परिषद आणि शहरी भागासाठी नगर विकास विभाग ‘विकसित भारत संकल्प यात्रा’ समन्वयक म्हणून काम करीत आहेत. प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये यात्रेच्या स्वागतासाठी स्वतंत्र समिती स्थापन करण्यात आली आहे. तसेच प्रत्येक तालुक्यासाठी नोडल अधिकारी नियुक्त करण्यात आले आहेत.



विकसित भारत संकल्प यात्रेदरम्यान प्रधानमंत्री आवास योजना, जलजीवन मिशन, आयुष्मान भारत योजना, प्रधानमंत्री उज्ज्वला योजना, स्वच्छ भारत मिशन, कृषि विभागाच्या योजना, माय भारत, धरती कहे पुकार के आदी योजनांची माहिती देण्यात येत आहे. तसेच लाभार्थ्यांच्या यशोगाथा दाखविण्यात येत असून या योजनांच्या लाभार्थ्यांचा सन्मान करणे, त्यांना लाभाचे वितरण करणे, वंचित लाभार्थ्यांची नोंदणी करण्यात येत आहे. विकसित भारत संकल्प यात्रेचे १५ डिसेंबरपर्यंतचे गावनिहाय नियोजन जिल्ह्यातील ग्रामीण भागात विकसित भारत संकल्प यात्रेच्या माध्यमातून जनजागृती करण्यात येत आहे. अहमदपूर तालुक्यात ८ डिसेंबर, २०२३ रोजी सकाळी शिंदगी बु., दुपारी किणी कदु, ९ डिसेंबर, २०२३ रोजी सकाळी सावरगांव थोट, दुपारी हंगरगा, १० डिसेंबर, २०२३ रोजी सकाळी उन्नी जांब, दुपारी हाडोळती, ११ डिसेंबर, २०२३ रोजी सकाळी आनंदवाडी, दुपारी सय्येदपूर खु., १२ डिसेंबर, २०२३ सकाळी बोडका, दुपारी आंबेगाव, १३ डिसेंबर, २०२३ सकाळी कुमठा बु., दुपारी कौडगाव, १४ डिसेंबर, २०२३ सकाळी बाबळदरा, दुपारी शिवणखेड, १५ डिसेंबर, २०२३ सकाळी वायगाव आणि दुपारी गादेवाडी येथे ही यात्रा जाईल. औसा तालुक्यात ८ डिसेंबर, २०२३ रोजी सकाळी जयनगर, दुपारी आपचूंदा, ९ डिसेंबर, २०२३ रोजी सकाळी किनीथोट, दुपारी येळी, १० डिसेंबर, २०२३ रोजी सकाळी भंगेवाडी, दुपारी सारोळा, ११ डिसेंबर, २०२३ रोजी सकाळी एरंडी, दुपारी आलमला, १२ डिसेंबर, २०२३

# नेरूळ येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिनी प्रविण गावडे यांनी केले अभिवादन

नवी मुंबई / के. एच. हनवते – नेरूळ नवी मुंबई येथे पहिल्यांदाच मराठा समाज बांधव प्रविण गावडे यांच्या वतीने महामानव प.पू. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६७ व्यां महापरिनिर्वाण दिनानिमित्त ६ डिसेंबर २०२३ रोजी सकाळी ११ वा. विनम्र अभिवादन सभा व बुद्ध भिम गित गायन काव्यांजली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी प्रमुख वक्ते समाधान मोरे (उपप्राचार्य – आय सी एल कॉलेज वाशी), महेश खरे (आर पी आय नवी मुंबई जिल्हाध्यक्ष), एल आर गायकवाड (सरचिटणीस आरपीआय), डॉ. सुदर्शन रणपिसे, डॉ. मोरे, कोंडीबा हिंगोले (कामगार युनियन), इत्यादी मान्यवरांनी उपस्थित रहावून महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे या देशातील प्रत्येक नागरिकांवर आनंत उपकार आहेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी या देशातील प्रत्येक भारतीय नागरिकांना संविधानाच्या माध्यमातून सर्वांना समान मतदानाचा अधिकार दिला. त्यामुळेच



आपल्या देशात समता, स्वातंत्र्य, बंधुत्व आणि सर्वांना समान न्याय दिला. म्हणूनच आपल्या देशात विविध जाती धर्म आसुन पण आपला भारत आखंडतेने नटलेला आहे. आपल्या भारत देशाची ओळख ही शेतीप्रधान देश म्हणून जगाच्या नकाशात देशाचे नाव प्रगतीपथावर विराजमान आहे आणि म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे देशाच्या जडणघडणीत फार मोठे योगदान राहीले आहे. आणि म्हणून त्यांच्या प्रती आपन पण काही तरी समाजाचे देणे लागतो या उदात्त हेतूने मराठा समाजसेवक : प्रवीण गावडे यांनी महामानवा प्रती विनम्र आभिवादन सभा व बुद्ध भिम गित गायनातून श्रद्धासुमण काव्यांजली व भावपूर्ण विनम्र अभिवादनसभा या कार्यक्रमाचे आयोजन करून महामानवांना खरे विनम्र अभिवादन केले आहे. मराठा समाज बांधवांनी पण यातून काही तरी बोध घेऊन आगामी काळात आपण पण काही तरी समाजकार्य केले पाहिजे हेच त्यांच्या कार्यातून समाजाला दाखवून दिले आहे. अशा या कार्यक्रमाचे आयोजन करून प्रविण गावडे यांनी फार मोठे धाडस केले आहे. मराठा समाज बांधवांनी पण बुद्ध, शिवाजी, फुले, शाहु आंबेडकर यांचे विचारच सर्व समाजाला प्रगतीपथावर घेऊन जाणारे आहेत हे त्यांना खऱ्या अर्थाने समजले, पठले आहेत आणि म्हणून त्यांनी अशा कार्यक्रमांचे आयोजन केले त्याबद्दल त्यांचे करावे तेवढे कौतुक कमीच आहेत अशा भावना आनेक मान्यवरांनी व्यक्त केल्या. अभिवादन सभेनंतर पंचशील गायन पार्टी नवी मुंबई यांनी बुद्ध भिम गित गायनातून भिमराव तायडे, कैलास सरकटे, अशोक जमादार, उमेश खंदारे यांनी आपल्या मधुर आवाजाने समाज प्रबोधन केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व विधीवत बुद्ध वंदना बौद्धाचार्य : कल्याणराव हनवते यांनी केले. शेवटी या कार्यक्रमस्थळी सर्व उपस्थितांना अल्पोहार, भोजनदान करून महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना विनम्र अभिवादन केले. या कार्यक्रमास लहान थोरांनी सहभाग घेऊन कार्यक्रमांची शोभा वाढवली त्याबद्दल आयोजकांनी सर्वांचे मनःपुर्वक जाहीर आभार व्यक्त करून कार्यक्रम संपन्न केला.

# फेब्रुवारीत आचारसंहिता?, लोकसभेचे बिगूल वाजणार

नवी दिल्ली : वृत्तसंस्था पाच राज्यांच्या निवडणुकीत भाजपला ३ राज्यांत मोठे यश मिळाले असून, या निवडणुकीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा करिश्मा कायम असल्याचे दिसून आले आहे. मुख्यमंत्रीपदाचा उमेदवार जाहीर केलेला नसतानाही पंतप्रधान मोदी यांनी राजस्थान, मध्य प्रदेशसह छत्तीसगडमध्ये भाजपला एकहाती सत्ता मिळवून दिली. त्यामुळे भाजपचा आत्मविश्वास दुणावला असून, आता त्यांनी लोकसभा निवडणुकीची तयारी सुरू केल्याचे चित्र आहे. जानेवारी महिन्यात अयोध्येतील राम मंदिराचे लोकार्पण पंतप्रधान मोदींच्या उपस्थितीत होणार आहे. त्यातच फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यात पुढील पाच वर्षांचा आराखडा मांडून लगेचच फेब्रुवारी महिन्यात आचारसंहिता लागू करून मार्चमध्ये निवडणुका घेण्याची शक्यता राजकीय तज्ज्ञ व्यक्त करीत आहेत. अनुकूल वातावरणाचा लाभ उठविण्याचा मोदी सरकारचा प्रयत्न आहे. त्यासाठी मार्च–एप्रिलमध्ये आचारसंहिता लागू करण्याऐवजी फेब्रुवारीतच आचारसंहिता लागू करून मार्च महिन्यात निवडणुका घेण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.पाच राज्यांच्या निवडणुकीकडे मिनी लोकसभा म्हणून पाहिले जात होते. या निवडणुकीत भाजप बाजी मारणार की काँग्रेस, यावर आगामी निवडणुकीचे गणित ठरणार होते. यामध्ये भाजपला तीन राज्यांत मोठे यश मिळाल्याने भाजपचा आत्मविश्वास वाढला आहे. त्यातच पक्षीय पातळीवर अगोदरपासूनच मतदारसंघनिहाय आढावाही घेतला गेला आहे.

# डॉ.आसिफ म.नाजीमोद्दीन पटेल रॉयल कॉलेजेस ऑफ फिजिशियन्स (UK)परीक्षा उत्तीर्ण

लातूर (प्रतिनिधी) लातूरचे सुपुत्र प्रतिभावान वैद्यकीय व्यावसायिक डॉ. आसिफ म.नाजीमोद्दीन पटेल (एम डी मेडिसीन) यांनी अलीकडेच त्यांच्या कारकिर्दीत दोन उल्लेखनीय टप्पे गाठले आहेत. त्यांनी केवळ प्रतिष्ठित एम.आर. सी.पी यु.के लंडन परीक्षाच उत्तीर्ण केली नाही तर नीट एस.एस सुपर स्पेशालिटी २०२३ परीक्षेत ५१५ ची प्रभावी अखिल भारतीय रँक देखील मिळवली आहे. एम.आर.सी.पी, रॉयल कॉलेज ऑफ फिजिशियन्सचे सदस्य ही पदवी वैद्यकीय कौशल्य आणि सक्षमतेचे प्रतीक म्हणून व्यापकपणे ओळखली जाते. हे पात्र वैद्यकीय व्यावसायिकांना यूके आणि कॉमनवेल्थ देशांमध्ये सल्लागार डॉक्टर म्हणून काम करण्याची परवानगी देते. या कठोर परीक्षेत डॉ.आसिफ पटेल यांचे यश हे त्यांचे उत्कृष्टतेचे समर्पण आणि उच्च दर्जाची आरोग्य सेवा प्रदान करण्याची त्यांची वचनबद्धता दर्शवते.



शिवाय, भारतातील सुपर स्पेशालिटी अभ्यासक्रमांसाठी पात्रता–सह–प्रवेश परीक्षा, नीट एस.एस मध्ये एवढी उच्च श्रेणी मिळवणे, डॉ. आसिफ पटेल यांच्या अपवादात्मक प्रतिभा आणि शैक्षणिक पराक्रमावर प्रकाश टाकते. या यशामुळे त्याला त्याच्या निवडलेल्या क्षेत्रात विशेष प्रशिक्षण घेण्याची आणि भारतातील वैद्यकीय शास्त्राच्या प्रगतीत महत्त्वपूर्ण योगदान देण्याचे दरवाजे उघडले. डॉ. आसिफ पटेल यांची कामगिरी केवळ वैयक्तिक अभिमानाचीच नाही तर इच्छुक वैद्यकीय व्यावसायिकांसाठी प्रेरणादायी आहे. त्यांचे समर्पण, कठोर परिश्रम आणि औषधाची आवड हे तरुण भारतीय डॉक्टरांच्या जागतिक आरोग्य सेवेच्या लँडस्केपवर महत्त्वपूर्ण प्रभाव पाडण्याच्या क्षमतेचा पुरावा आहे. डॉ.आसिफ पटेल हे औसा नगर पालिकेचे वरिष्ठ लिपिक मुद्दसिर काजी यांचे भाचे आहेत.

# माफसुचे संग्रहालय जनतेसाठी खुले संग्रहालय म्हणजे विज्ञानाची तीर्थक्षेत्रे – डॉ. नितीन पाटील

नागपूर :– महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठाचे संग्रहालय म्हणजे केवळ शेतकरी, पशुपालक, संशोधक यांचेसाठी रंजक माहितीचे संसाधन नसून शालेय विद्यार्थ्यांसाठी विज्ञान युगातील आधुनिक तीर्थक्षेत्र असल्याचे मत विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन पाटील यांनी २३ व्या विद्यापीठ स्थापना दिनाचे औचित्याने आयोजित कार्यक्रमात केले. यावेळी माफसूच्या वतीने सेमिनरी हिल्स येथील विद्यापीठ ग्रंथालय परिसरात उभारलेल्या विद्यापीठाचे संग्रहालय जनतेला पाहण्यासाठी खुले असल्याचे प्रतिपादन केले. पशुवैद्यकीय विद्यापीठामार्फत ज्ञान प्रसारणासाठी स्थापन करण्यात आलेले हे सुरेख संग्रहालय सांघिक प्रयत्नातून निर्माण झाल्याचे संचालक विस्तार शिक्षण, माफसू तथा संग्रहालय समितीचे अध्यक्ष डॉ. अनिल भिकाने यांनी यावेळी आपल्या प्रास्ताविक भाषणात सांगीतले. माफसू विद्यापीठांतर्गत पशुवैद्यकीय, दुग्धतंत्रज्ञान आणि मत्स्यविज्ञान विद्याशाखांचे पदवी आणि पदव्युत्तर उच्च शिक्षण प्रदान केले जाते, या संकल्पनेवर या तिन्ही घटकांची माहिती विविध आकर्षक माहितीफलक, प्रारूप प्रतिकृती, पुतळे यांच्या माध्यमातून विविध दालनात मांडली आहे. याव्यतिरिक्त टॅक्सीडर्मी, वन्यजीव संवर्धन, प्रेक्षागृह आदी विभाग विशेष प्रेक्षणीय आहेत. नागपूर शहरात मध्यवर्ती संग्रहालय, मानववंश संग्रहालय, रेल्वे संग्रहालय, रमण विज्ञान केंद्र अशा नामांकित संग्रहालयाच्या जोडीला माफसू विद्यापीठाचे संग्रहालय प्रेक्षकांसाठी पर्वणीच ठरणार असल्याने अधिकाधिक संख्येने भेटी देण्याचे



आवाहन विद्यापीठाचे वतीने करण्यात आले आहे. याप्रसंगी संचालक शिक्षण तथा पशुविज्ञान शाखेचे अधिष्ठाता डॉ. शिरीष उपाध्ये, कुलसचिव तथा संचालक संशोधन डॉ. नितीन कुरकुरे, अधिष्ठाता (मत्स्यविज्ञान), डॉ. सचिन बोंडे, पशुवैद्यक महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. आरजू सोमकुवर, मत्स्यविज्ञान महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. सुधीर कविटकर, नियंत्रक (वित्त व लेखा) श्रीमती मनिषा शेंडे, विद्यापीठ ग्रंथपाल श्री सुनिल गावंडे, परिक्षा नियंत्रक डॉ. भुषण रामटेके आदी मान्यवरांसह संग्रहालय निर्मिती समितीचे सदस्य, विद्यापीठातील अधिकारी वृंद तथा कर्मचारी उपस्थित होते. संग्रहालय निर्मितीत मोलाचे योगदान देणारे कलाकर प्रशांत जेपुलकर यांचा कुलगुरू महोदयांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. संग्रहालय समितीचे सचिव डॉ सारिपुत लांडगे यानी कार्यक्रमाचे सुत्रसंचलन केले. तसेच कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विस्तार संचालनालयाचे डॉ गितांजली ढुमे, श्री प्रविण बागडे, मोहन कापसे, सुशील जांभुळे आदींनी अथक परिश्रम घेतले.

# आंबेडकरी विचार माणसात माणूसपण निर्माण करतात - कवी देवानंद पवार

छत्रपती संभाजी नगर :– डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६७ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त बौध्द पंच मंडळ निसर्ग कॉलनी, भावसिंगपूरा येथे वैचारिक अभिवादन करण्यात आले यावेळी प्रमुख वक्ते म्हणून सुप्रसिद्ध कवी,विचारवंत प्रा.देवानंद पवार यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर अतिशय सुस्पष्ट शब्दात सर्वांना समजेल अशा प्रकारे आपल्या स्वतःच्या लेखणीने समृद्ध केलेल्या गाण्याच्या स्वरूपात अभिवादन केले आणि समाजाला एकोप्याने राहण्याचा संदेश दिला. तसेच आंबेडकरी विचार माणसात माणूसपण निर्माण करतात असे प्रतिपादन त्यांनी केले. यावेळी माता रमाबाई आंबेडकर यांचा त्याग डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी लिहिलेल्या पत्रातून सांगितला. त्याचप्रमाणे नानकचंद रत्तू सोबत केलेला संवाद सुद्धा त्यांनी मांडला त्यामध्ये



बाबासाहेब असं म्हणतात मी हा समाजकार्याचा रथ मोठ्या कष्टाने जिथे आज दिसतो तिथ पर्यंत आणलेला आहे. त्यास पुढे जर नेता आले नाही , तर तो तिथेच ठेवा , परंतू त्यास कुठल्याही परिस्थितीत मागे आणू नका.हाच माझा आपल्याला संदेश आहे. या अभिवादन सभेचे अध्यक्षस्थान रमेश साळवे माजी सैनिक यांनी भूषविले. तर सूत्रसंचालन प्रा.डॉ.संघरत्न गवई यांनी केले तर प्रास्ताविक प्रा.डॉ. कोंडबा हाटकर यांनी केले. आभार प्रदर्शन प्रा.संदीप गव्हांदे यांनी केले. अभिवादना साठी निसर्ग कॉलनीतील बौद्ध पंच मंडळातील बौद्ध उपासक उपासिका यांची उपस्थिती होती. यामध्ये एकनाथ मानवते,देविदास वाकोडे,धम्मपाल जाधव, प्रा.हनुमंत पाईक,ठेकेदार उत्तम जोगदंडे, कैलास राऊत, ज्ञानेश्वर जाधव, दिलीप जाधव,शिवाजी गवई, नरहरी जाधव, अंकुश जाधव,सुकेश सोनुने, विद्याताई पगारे, पूनमताई कांबळे,प्रियंकाताई गव्हांदे,दिक्षाताई गवई, साळवेताई यांनी अभिवादन केले

# जिल्हा युवा मोहत्सव स्पर्धेत शुभांजली थोरात प्रथम

अहमदनगर :– क्रीडा युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्यव कृषी संचालनालय महाराष्ट्र राज्य यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित अहमदनगर येथे जिल्हास्तरीय युवा मोहत्सव स्पर्धेत सांस्कृतिक विभागात वैयत्तीक सोलो लोकगीत नृत्य स्पर्धेत लाल बहादूर शास्त्री विद्यालय टाकळी कडे वळीतची विद्यार्थिनी सोलो डान्सर शुभांजली सुभाष थोरात हिने प्रथम क्रमांक पटकावला. विभागीय स्तरावर बारामती येथे पुढील स्पर्धा होईल. मुख्याध्याक हिरवे सर, यांनी तिचे अभिनंदन



केले. शाळेतील शिक्षक रवींद्र झुंजार, कविता अंनत्रे, सचिन खामकर यांचे मार्गदर्शन लाभले

# अर्थिक विषमतेच्या मुक्तीचा लढा हिच खरी बाबासाहेबांना श्रद्धांजली..! - नारायण बागडे

बृह मुंबई / प्रतिनिधी :– लुंबिनी बाग सभागृह गोवंडी मुंबई येथे ६ डिसेंबर च्या पुर्व संधेला अर्थिक विकास परिषदे ला संबोधीत करताना आंबेडकरी विचार मोर्चा चे राष्ट्रीय अध्यक्ष : नारायण बागडे म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे एक महान अर्थ तज्ञ होते आणि त्यांच्या सामाजिक, शैक्षणिक लढाईची सुरवात हि सुद्धा अर्थिक परिवर्तनाची होती. अर्थिक्ते शिवाय जग, देश, घर सक्षम राहू शकत नाही या शब्दांची गरिमा ओळखून त्यांनी भारतीय संविधानाच्या माध्यमातून आरक्षणच नाही तर अर्थिक दिशा दिली. पंरतू आम्ही हा मार्ग सुकर न करता राजकारण्यांचा वरदहस्त झालो. त्याचमुळे आज सत्तर टक्के समाज अर्थिक परिस्थितीच्या सामना करत आहेत असे प्रतिपादन (आंविमो) आंबेडकरी रिपब्लिकन मोर्चा चे राष्ट्रीय अध्यक्ष : नारायण बागडे यांनी वरिल उदगार केले. ते गोवंडी येथील लुंबिनी बाग, राहूल सेवा मंडळाच्या सभागृहात आयोजित अर्थिक विकास परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वैशाली दुपटे हे तर प्रमुख पाहुणे म्हणून अल्पसंख्यांक समाजातील प्रख्यात नेते : जॅक्सन जोसेफ, महिला मोर्चाच्या पौर्णिमा पाईकराव, गीता पाखरे, दिलिप कदम, हे होते. जॅक्सन जोसेफ यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे प्रथम या जगातील अर्थ तज्ञ कसे होते यावर सविस्तर माहिती




दिली ते म्हणाले दि प्रॅब्लम ऑफ रुपी या ग्रंथाच्या माध्यमातून त्यांनी जगाला आर्थिक देवाणघेवाण या वर अंकुश ठेवण्यासाठी रिझर्व्ह बँकेचे धोरण जाहीर केले. हे काम साधे सोपे नव्हते आणि तो चमत्कार आपल्या कुशल कामगिरीतुन करून दाखवीला असे जोसेफ यांनी आपल्या विचारपूर्वक भाषणात सांगितले. पौर्णिमा पाईकराव यांनी महिलांच्या आर्थिक विकास घडवून आणण्यासाठी आंबेडकरी महिला मोर्चा मध्ये सामील व्हा असे आवाहन केले, गीता पाखरे म्हणाल्या की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सर्व जाती धर्माच्या महिलांचा विचार करून आर्थिक, शैक्षणिक विकासासाठी जिवन भर संघर्ष केला असे ठामपणे सांगितले. दिलिप कदम यांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना आपल्या विचारपूर्वक भाषणातून अभिवादन केले. तथागत गौतम बुद्ध आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या फोटो ला शिक्षीका सुषमा गायकवाड यांनी पुष्पहार अर्पण केला संगिता जैस्वार उज्वला रुपवते, सुनिता टपाल, रुपाली कांबळे, गायत्री चव्हाण यांनी दिपप्रज्वलन केले. परिषदेचे प्रास्ताविक शंकर बोर्डे यांनी केले. सुत्रसंचालन बौद्ध धर्मा बागडे यांनी यशस्वीपणे पूर्ण केले या प्रसंगी नागपूर ते चैत्यभूमी बाइक द्वारे चालवत आलेल्या धम्म योध्यांचा धम्म योद्धा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे जॅक्सन जोसेफ यांचा सत्कार प्रविण आवळे, हंसराज उरकुडे, दादाराव पाटील, सचिन नगराळे, गौतम बागडे यांनी केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षा : वैशाली दुपटे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात सांगितले की, आर्थिक विकास परिषदेच्या माध्यमातून तळागाळातील लोकांच्या आर्थिक, शैक्षणिक, आरोग्य, बेरोजगारांना रोजगार, बेघरांच्या समस्या यांचें निराकरण करण्यासाठी लवकरच आंबेडकरी रिपब्लिकन मोर्चा मोठा लढा उभारून आर्थिक दिशा देणार आहे असे सांगितले. शेवटी कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन बागुल यांनी केले आंबेडकरी चळवळीत काम करणारे कवी पार्र्ईकराव, टपाल साहेब समता सैनिक दल कमांडर, गायकवाड साहेब, शंकर बोर्डे यांना कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सुधिर वासनिक, शरद बनसोडे, उज्वला रुपवते, कमलाबाई वाघमारे, मंगल कांबळे, आरती केदारे, दिपाली कुरूडकर, मदिना शेख, आदिनाथ अभांरे, सुरैया वारोसे, राजू सोनवणे, यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमात मोठ्या संख्येने मुंबई, ठाणे, नवी मुंबई, येथील महिला पुरुष कार्यकर्ते उपस्थित होते असे आंबेडकरी महिला मोर्चाच्या मुंबई प्रदेश महासचिव गीता पाखरे यांनी प्रसिध्दी पत्रकादवारे कळविले.

# महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना विनम्र अभिवादन

**परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. दिगंबर नेटके आणि श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष शिवशंकर अप्पा बिडवे यांची प्रमुख उपस्थिती**

लातूर :– श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था द्वारा संचलित महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६७व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड येथील परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. दिगंबर नेटके आणि श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष शिवशंकर अप्पा बिडवे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले. यावेळी सिनेट सदस्य डॉ. डी.एन.मोरे, प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई, उपप्राचार्य डॉ. राजकुमार लखादिवे, उपप्राचार्य प्रा. संजय पवार, पर्यवेक्षक प्रा. शिवशरण हावळे, परीक्षा सहकेंद्रप्रमुख डॉ. नवनाथ सिंगापुरे, डॉ. बाळासाहेब गोडबोले, डॉ.



दीपक चाटे, डॉ. रत्नाकर बेडगे, प्रा. धोंडीबा भुरे, कार्यालय प्रमुख नामदेव बेंदरगे आणि रत्नेश्वर स्वामी यांची उपस्थिती होती. यावेळी सिनेट सदस्य डॉ.डी.एन.मोरे यांनी संविधान उद्देश पत्रिकेचे सामूहिक वाचन केले. यावेळी डॉ. दिगंबर नेटके म्हणाले की, आज डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा ६७वा महापरिनिर्वाण दिन आहे. भारतीय संविधान हे सर्व विश्वासाठी प्रेरणादायी आहे असे ते म्हणाले. यावेळी प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई म्हणाले की, आज महाविद्यालयात महापरिनिर्वाण दिनानिमित्त परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. दिगंबर नेटके आणि श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष शिवशंकर अप्पा बिडवे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना पुष्पहार घालून अभिवादन केले हे आपल्या सर्वासाठी प्रेरणादायी आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी समाजातील शोषित, दुःखी, पीडित आणि गरिबांची दु:ख दूर केली म्हणून त्यांना मुक्तिदाता म्हणून सुद्धा संबोधले जाते. त्यांच्या विचारांची प्रत्यक्ष कृती हीच खऱ्या अर्थाने त्यांना भावपूर्ण आदरांजली असेल असेही ते म्हणाले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. रत्नाकर बेडगे यांनी केले तर आभार उपप्राचार्य डॉ. राजकुमार लखादिवे यांनी मानले. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील शिक्षक–शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.



जेष्ठ पत्रकार : कल्याणराव एच. हनवते याना आंबेडकरी विचार मोर्चा २०२३ / २४ चा धम्म योद्धा पुरस्कार प्रदान करताना आंबेडकरी विचार मोर्चा चे राष्ट्रीय अध्यक्ष नारायण बागडे व जॅक्सन जोसेफ यांचे क्षणचित्र

# नवी मुंबई मनपा नेरूळ बि विभागाच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन सभा

नवी मुंबई / के. एच. हनवते :– नेरूळ 'बि, विभाग कार्यालय नवी मुंबई महानगर पालीका यांच्या वतीने महामानव प.पु. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना ६७ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त विनम्र अभिवादन करून सभेचे आयोजन करण्यात आले होते सर्व प्रथम छ. शिवाजी महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस नवी मुंबई मनपा नेरूळ बि विभागाचे अधीकारी प्रबोधन मवाडे यांच्या हस्ते पुष्पहार व मेणबत्ती दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात विधीवत बुद्ध वंदना बौद्धाचार्य कल्याणराव हनवते यांनी घेऊन कार्यक्रमाची सुरुवात केली. तद्नंतर स्वच्छता अधिकारी राजेन्द्र इंगळे यांनी सर्व ऊपस्थित कर्मचारी अधिकारी यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे महापरिनिर्वाण दिन व त्यांनी केलेले कार्य किती ? महान आहे. संविधानाच्या माध्यमातून भारत देशाच्या जडणघडणीत महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे फारमोठे योगदान आहे. डॉ. बाबासाहेबांना आयुष्य जेमतेम ६७ वर्षेच लाभले, आयुष्य लहान पण त्यांचे कार्य खूपच महान आहे.



या विषयावर आपले विचार व्यक्त करून श्रोत्यांची मने जिंकली. अशा या कार्यक्रमाचे आयोजन नियोजन नेरूळ स्वच्छता कर्मचारी संतोष मनोरे हे आपल्या महान युगपुरुषांचे सतत छोटे मोठे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात सिंहाचा वाटा आसतो. या कार्यक्रमास युनियन कामगार नवी मुंबई जिल्हाध्यक्ष कोडींबा हिंगोले व तसेच नेरूळ विभाग कर्मचारी, अधिकारी यांनी शेकडोंच्या संख्येत ऊपस्थित राहुन महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना विनम्र अभिवादन करून संपन्न केली.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE